दैनिक
# अधिकारनामा
विदर्भातील सर्वाधिक पसंतीचे दैनिक

Email : adhikarnama2021@ gmail.com    Web : www.adhikarnama.in

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८०    कार्यालय : दै. अधिकारनामा, विवरा जि. अकोला – ४४४५११

अकोला * मंगळवार दि. ०६ सप्टेंबर २०२२ * वर्ष २ रे * अंक १४ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842

## ‘एकनाथजी आणि देवेंद्रजींची जोडी...”
## मुंबई दौरा संपताच अमित शाहांचे सूचक ट्विट

दै. अधिकारनामा

**मुंबई :** देशाचे गृहमंत्री अमित शाह यांचा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित मुंबई दौरा आज पार पडला. काल रात्री मुंबई दाखल झालेल्या अमित शाह यांनी आज शहरातील निवडक गणपती बाप्पांचे दर्शन घेतले. मुंबईतील प्रसिद्ध अशा लालबागचा राजा गणरायाच्या दर्शनाने त्यांनी दौऱ्याची सुरूवात केली. त्यानंतर वर्षा येथील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरातील गणरायाचे आणि सागर बंगल्यावरील देवेंद्र फडणवीस यांच्या घरातील गणरायाचे अमित शाह यांनी दर्शन घेतले. या दौऱ्यामध्ये अमित शाह यांनी मुंबईत भाजपाच्या नेते, मंत्री आणि पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अमित शाह यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करत, ’उद्धव ठाकरेंनी आपल्याला दगा दिला आणि शिवसेनेने पाठीत खंजीर खुपसला’, असे थेट मत व्यक्त केले. त्यानंतर, अमित शाह यांनी



मुंबई दौरा संपताच एक सूचक ट्विट केले. ठमुंबईत भाजपा खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस ही जोडी जनतेच्या हितासाठी समर्पित वृत्तीने काम करत आहेत, जनता NDA सोबत आहे. मला विश्वास आहे की आगामी BMC निवडणुकीत NDA प्रचंड बहुमताने विजयी होईलठ, असं सूचक ट्विट अमित शाह यांनी केले.

तुम्हाला माहिती आहे, उद्धव ठाकरेंनी आपल्याला दगा दिला. शिवसेनेनं पाठीत खंजीर खुपसलं. त्यामुळे उद्धव ठाकरेंना जमीन दाखवा. भाजपने कधीच छोटा भाऊ-मोठा भाऊ म्हटले नाही. राजकारणात काहीही करा, पण धोका सहन करु नका. जे दगा देतात त्यांना योग्य शिक्षा झालीच पाहिजे. प्रत्येक कार्यकर्ता मैदानात उतरला पाहिजे. तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर, नेते देवेंद्र फडणवीसांच्या कामावर मतं मागितली आणि जिंकून आले. त्यानंतर तुम्ही जनतेचा विश्वासघात केला. मुंबईतल्या राजकारणावर वर्चस्व केवळ भाजपचे असावे. उद्धव ठाकरेंनी केवळ दोन जागांसाठी २०१४ मध्ये आपल्यासोबतची युती तोडली. ते खयाली पुलाव पकवत होते. त्यांना वाटलेलं भाजपा युती तोडणार नाही. आपल्याशिवाय भाजपाचं काय होणार, आपल्याच जास्त जागा जिंकून येतील, असा त्यांचा समज होता. जो चुकीचा ठरला, असा टोला अमित शाहांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

## मुख्यमंत्र्यांच्या सुपुत्राने खाल्ला चहा-पाव

दै. अधिकारनामा

**कल्याण :** ठाणे जिल्ह्यातील कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काल अंबरनाथपासून गणेश दर्शन करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा कार्यक्रम पहाटेपर्यंत चालला. त्यानुसार, आज पहाटे चार वाजता खासदार शिंदे यांनी चहासह कल्याणच्या दूधनाक्यावरील मलई पावावर ताव मारला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजकीय बंड केल्यावर ते मुख्यमंत्री झाले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह त्यांचे खासदार सुपुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही राजकारणात आघाडी घेतली आहे. गणेशोत्सवात मुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन गणेश दर्शन घ्यावे अशी मागणी सगळ्याच कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.



ठाण्यातील नाकती यांच्या घरी जाऊन मुख्यमंत्र्यांनी गणेश दर्शन घेतले. तीच मागणी कल्याण डोंबिवली परिसरातून होत होती. मात्र, मुख्यमंत्र्यांना सगळ्याच कार्यकर्त्यांच्या घरी जाणे शक्य होणार नाही. त्यामुळे खासदार शिंदे यांनी त्यांच्या व्यस्त कामकाजातून वेळ काढत काल दुपारी अंबरनाथपासून प्रत्येक कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन गणेश दर्शन घेतले. त्यांचा हा कार्यक्रम पहाटे चार वाजता शिवसेनेचे माजी नगरसेवक रवी पाटील यांच्या घरच्या गणेश दर्शनानंतर संपला. मात्र, पहाटे चार वाजता काय खाणार. त्यांनी पाटील यांच्या घरी चहा घेत कल्याणचा प्रसिद्ध मलई पाव मागविला. त्यावर त्यांनी चांगलाच ताव मारला. बोलता बोलता ते बोलून गेले की, आणखीन दोन तासांनी इडली खावी लागेल. त्यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये हशा पिकला. त्यावेळी डोंबिवलीचे राजेश मोरे, राजेश कदम आदी उपस्थित होते.

## गुजरातला विरोध करणाऱ्यांना जागा नाही;
## अमित शाह यांचा मेधा पाटकरांना इशारा

दै. अधिकारनामा

**सुरत :** मुंबई दौऱ्यावर येण्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी (४ सप्टेंबर) गुजरात दौऱ्यावर असताना आम आदमी पक्षाचे (आप) राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर निशाणा साधला. काही लोक सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना मागच्या दाराने गुजरातच्या राजकारणात उतरवण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा शाह यांनी केला. मेधा पाटकर यांनी राज्याची जीवनवाहिनी असलेल्या नर्मदा प्रकल्पाला विरोध केला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ’आप’ने नर्मदा बचाव आंदोलनाच्या संस्थापक सदस्य पाटकर यांना मुंबईच्या ईशान्य मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. गृहमंत्री अमित शाह म्हणाले, नर्मदा प्रकल्पाला विरोध करणाऱ्या मेधा पाटकर यांना मागच्या दाराने गुजरातच्या राजकारणात उतरवण्यासाठी काही लोकांनी नवी सुरुवात केली आहे. मला गुजरातच्या



तरुणांना विचारायचंय, नर्मदा प्रकल्पाला तसेच गुजरातच्या विकासाला विरोध करणाऱ्यांना राज्यात येऊ देणार का?ठ असा सवाल त्यांनी विचारला. विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी गुजरातमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ३६व्या राष्ट्रीय खेळांच्या उद्घाटन समारंभात अमित शाह एका सभेला संबोधित करत होते.

ठज्यांना गुजरात आणि आपली जीवनवाहिनी नर्मदा प्रकल्पाला विरोध करणाऱ्या मेधा पाटकरांना आणायचे आहे. ते प्रत्येक व्यासपीठावर गुजरातला बदनाम करण्याची एकही संधी सोडत नाहीत, त्यांनी हे थांबवायला हवं. गुजरातचा विरोध करणाऱ्यांना कुठलीही जागा नाही. गुजरातच्या जनतेवर माझा विश्वास आहे राज्याला विरोध करणाऱ्यांना ते कदापि स्वीकारणार नाही असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. मोदींच्या नेतृत्वाखाली गुजरातमध्ये रस्ते आणि बंदरे यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यात आला आहे. २४ तास वीजपुरवठा दिला जात आहे. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था मजबूत करण्यात आला आहे. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गुजरातने गेल्या २० वर्षात अनेक क्षेत्रांत विकास केला आहे आणि असे रेकॉर्ड प्रस्थापित केले आहेत जे कदाचित येत्या काही दशकात मोडता येणार नाहीत असंही अमित शाह म्हणाले.

## ‘मास्टरकार्ड’ बीसीसीआयचा नवा टायटल स्पॉन्सर

दै. अधिकारनामा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मास्टरकार्डसोबत शीर्षक प्रायोजकत्वासाठी करार केला आहे. त्यामुळे आता येणाऱ्या सर्व देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय (महिला आणि पुरूष) सामन्यांसाठी मास्टरकार्ड भारतीय संघाचे शीर्षक प्रायोजक असणार आहे. मास्टरकार्ड हे घरच्या मैदानावर आयोजित सर्व सामने आणि आंतरराष्ट्रीय सामने (महिला आणि पुरुष दोन्ही), बीसीसीआयतर्फे आयोजित केलेल्या इराणी ट्रॉफी, दुलीप ट्रॉफी आणि रणजी ट्रॉफी सारख्या देशांतर्गत क्रिकेट सामन्यांसाठी तसेच सर्व ज्युनियर क्रिकेट (१९ आणि २३ वर्षांखालील) शीर्षक प्रायोजक असणार आहे. बीसीसीआयचे अध्यक्ष सौरभ गांगुली म्हणाले की, आगामी काळात घरच्या मैदानावर खेळवण्यात येणा्या क्रिकेट सामन्यांसाठी शीर्षक प्रायोजक म्हणून मास्टरकार्डचे स्वागत करतो. आंतरराष्ट्रीय मा ा लि वो ७ बा रो बा र चा बीसीसीआयच्या देशांतर्गत स्पर्धा महत्वाच्या आहेत. कारण त्या देशाला एक मजबूत आंतरराष्ट्रीय संघ बनवण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. भारताचा माजी कर्णधार धोनीने देखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. धोनी मागील चार वर्षांपासून मास्टरकार्डचा ब्रँड ॲम्बेसीडर आहे. धोनी म्हणाला, क्रिकेट हे माझे जीवन आहे. आज माझ्याकडे जे काही आहे ते मला क्रिकेटने दिले आहे. मास्टरकार्ड बीसीसीआयचे सर्व देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय सामने आणि विशेषतः ज्युनियर आणि महिला क्रिकेटचे प्रायोजकत्व करत आहे याचा मला आनंद आहे.

## लिझ ट्रस ब्रिटनच्या नव्या पंतप्रधान

दै. अधिकारनामा

ब्रिटनमध्ये गेल्या काही काळापासून सुरु असलेल्या पंतप्रधान पदाची निवड आज संपली आहे. अनिवासी भारतीय उद्योजक ऋषी सुनक यांचा पराभव करून लिझ ट्रस ब्रिटनच्या नव्या पंतप्रधान बनल्या आहेत. ऋषी सुनक आणि लिझ ट्रस यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली होती. ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी राजीनामा दिला होता. लैंगिक शोषणाचे आरोप असलेल्या क्रिस पिंचर यांना बोरिस यांनी सरकारमध्ये सहभागी करून घेतल्याचा वाद उफाळून आला होता. यामुळे सुनक यांच्यासह जवळपास ५० जणांनी



राजीनामा देत बंड पुकारले होते. यात सरकारचे मंत्रीदेखील असल्याने जॉन्सन यांनी अखेर राजीनामा दिला होता. यानंतर नवा पंतप्रधान निवडण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा नवा नेता निवडण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर सुनक आणि ट्रस यांच्यात चुरस होती. देशात रोजगार संकट, औद्योगिक अशांतता आणि मंदीचा सामना करत असताना देशाची सत्ता हाती घेण्यास लिझ तयार आहेत. टीव्ही डिबेटमध्ये सुनक त्यांच्या खूप मागे पडले होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, निवडणूक प्रचारादरम्यान, ऋषी सुनक हे देशातील समस्यांबाबत जनतेवर फारसा प्रभाव टाकू शकले नाहीत तर कंझर्व्हेटिव्ह पक्षातील त्यांच्या प्रतिस्पर्धी लिझ ट्रस या ते करण्यात यशस्वी ठरल्या आहेत.लिझ ट्रस यांनी कर कमी करण्याच्या आश्वासनावर निवडणूक लढवली आहे. पंतप्रधान झाल्यास १.२५ टक्क्यांपर्यंत कर कपात करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे, तर ऋषी सुनक याउलट कर वाढवण्याचा आग्रह धरत राहिले. कर कपातीचा फायदा फक्त श्रीमंतांनाच होईल, त्यामुळे त्याची गरज नाही असे ऋषी सुनक यांनी म्हटले होते.

## रशियन दुतावासावर आत्मघाती बॉम्बहल्ला

दै. अधिकारनामा

**काबुल :** युक्रेन - रशियाच्या युद्धाला सहा महिने पूर्ण झाले आहेत. अशातच आता रशियाला बाहेरच्या देशांतही हल्ल्याला सामोरे जावे लागत आहे. अफगाणिस्तानची राजधानी काबुलमधील रशियन दुतावासासमोर आज भीषण आत्मघाती बॉम्बहल्ला झाला आहे. यामध्ये दोन रशियन राजनैतिक अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. तर ११ जण जखमी झाले आहेत. याबाबत तालिबान सरकारने आतापर्यंत काहीही माहिती दिलेली नाही. आत्मघाती हल्लेखोर दूतावासाकडे जात असताना त्याला ठार करण्यात आल्याचे स्थानिक पोलिसांनी म्हटले आहे. सोमवारी



झालेला स्फोट इतका शक्तिशाली होता की आजूबाजूच्या घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत असे एका नागरिकाने म्हटले आहे. काही रिपोर्टमध्ये २० जणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे.

रशियन दुतावासासमोर व्हिसासाठी लोक अर्ज करायला आले होते. त्यांना लक्ष्य करायचे होते, असा प्राथमिक अंदाज आहे. रशियन सरकारचे वृत्तपत्र रिया नोवोस्तीने याबाबत अद्याप काही माहिती दिलेली नाही. परंतू, व्हिसासाठी आलेल्या लोकांना रशियाचे अधिकारी नाव विचारून त्यांची तपासणी करत होते, तेवढ्यात हा हल्ला झाला आहे. यात दोन अधिकारी देखील ठार झाल्याचे सांगण्यात येत आहे. २०१६ मध्ये देखील याच दुतावासासमोर बॉम्ब हल्ला झाला होता. या स्फोटात १२ जण ठार तर २० हून अधिक जण जखमी झाले होते. शुक्रवारी हेरात प्रांतात झालेल्या बॉम्बस्फोटात एक अफगाण धर्मगुरू तसेच इतर काही जण ठार झाले. मशिदीत आणखी एक स्फोट झाला होता ज्यात २१ जणांचा मृत्यू झाला होता तर ३० जण जखमी झाले होते.

## पाकिस्तानात पुरामुळे हाहाकार; १३०० जणांचा मृत्यू

दै. अधिकारनामा

पाकिस्तानमध्ये पुरामुळे हाहाकार माजला आहे. मुसळधार पाऊस आणि महापुराने जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पुरात आतापर्यंत एकूण १३०० लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आहे. तसेच, पुरामुळे आता संक्रमणाचा धोका वाढला आहे. संक्रमणामुळे होणारे रोग पसरू नयेत, यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न तीव्र केले आहेत. याशिवाय, पाकिस्तानची आर्थिक स्थितीही कोलमडली आहे. या पुरात पाकिस्तानचे १२.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे नुकसान झाले आहे. पाकिस्तानमध्ये आलेल्या भीषण पुरानंतर अनेक लोकांना कॅम्प आणि मदत छावण्यांमध्ये राहण्यास भाग पडले आहे. आज पाकिस्तानची परिस्थिती अशी झाली आहे की, देशाचा एक तृतीयांश भाग पुराच्या तडाख्यात




सापडला आहे. अशा परिस्थितीत पूरग्रस्तांना मदत करणे हे पाकिस्तानसमोरील सर्वात मोठे आव्हान आणि गरज आहे. सिंधचा परिसर पुरामुळे प्रभावित झाला आहे. जनतेसमोर अन्न व पाण्याचे संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत सरकारी मदत हाच त्यांच्या जगण्याचा एकमेव आधार आहे.

याचबरोबर, पुराचे पाणी जसजसे कमी होत आहे, तसतसे याठिकाणी रोगराई देखील पसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागांमध्ये डॉक्टरांची पथकेही तैनात करण्यात आली आहेत. छावणीत राहावे लागलेले लोकही अनेक आजारांनी ग्रस्त आहेत. त्यांच्यामध्ये विविध प्रकारचे आजारही पसरत आहेत. या आजारांचा सर्वाधिक बळी लहान मुले होत आहेत. प्रांतातील निवारा शिबिरांमध्ये किमान ४७,००० गर्भवती महिला होत्या. वारंवार होणाऱ्या संसर्गामुळे होणारे आजार रोखण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. महापुरामुळे देशाचा एक तृतीयांश भाग बुडाला आहे आणि ३३ मिलियनहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. आधीच डळमळलेल्या पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला १२.५ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले आहे. जिओ न्यूजच्या अहवालानुसार, महागाई दर २४ टक्क्यांवरून २७ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे आणि चालू आर्थिक वर्षात तो ३० टक्क्यांपर्यंत पोहोचेल. याशिवाय, गरिबी (इद्नूब) आणि बेरोजगारी २१.९ टक्क्यांवरून ३६ टक्क्यांहून अधिक वाढण्याची शक्यता आहे.

## कॅनडात २५ जणांवर चाकूने हल्ला

दै. अधिकारनामा

**नवी दिल्ली :** कॅनडात धक्कादायक घटना घडली आहे. कॅनडाच्या सस्कॅचेवान प्रांतात वेगवेगळ्या ठिकाणी चाकू हल्ल्यात १० जणांचा मृत्यू झाला आहे, तर १५ जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. हल्लेखोर फरार आहेत. रॉयल कॅनेडियन माउंटन पोलिसांनी (आारसाि एमापाि) हल्लेखोरांसदर्भात अलर्ट जारी केला आहे. सस्कॅचेवान प्रांतातील जेम्स स्मिथ क्री नेशन आणि वेल्डनमध्ये घडलेल्या धक्कादायक घटनेनंतर आरसीएमपीने राज्यभरातील संशयित हल्लेखोरांसाठी अलर्ट जारी केला आहे. सस्कॅचेवानच्या ईशान्येकडील जेम्स स्मिथ क्री नेशन आणि वेल्डन व्हिलेजमध्ये ठिकठिकाणी चाकूहल्ला झाल्याचे



DAMIEN SANDERSON    MYLES SANDERSON

पोलिसांचे म्हणणे आहे. आरसीएमपीच्या म्हणण्यानुसार, संशयित हल्लेखोरांची नावे डॅमियन सँडर्सन आणि माइल्स सँडर्सन अशी आहेत. त्यांच्या शोधासाठी संपूर्ण राज्यात अलर्ट जारी करण्यात आला आहे. हल्ल्यामागे संशयितांचा हेतू काय होता, हे अद्याप समजू शकलेले नाही. आारसीएमपी सस्कॅचेवानचे सहाय्यक आयुक्त रोंडा ब्लॅकमोर यांनी सांगितले की, काही पीडितांना संशयितांनी लक्ष्य केले होते, परंतु इतरांवर अचानकपणे हल्ला करण्यात आला होता. त्यामुळे यामागचा हेतू अद्याप कळू शकलेला नाही. जे घडले आहे, भयावह आहे.

याचबरोबर, जखमींचा आकडा वाढू शकतो, असेही ब्लॅकमोर यांनी सांगितले. ते म्हणाले, आम्ही हल्लेखोरांना पकडण्यासाठी आमच्या सर्व साधनांसह व्यापक शोध मोहीम राबवत आहोत.ठ तसेच, दोन्ही संशयित हल्लेखोर रेजिना येथील आकीला अव्हेन्यू येथून प्रवास करत असावेत. रात्री ११.२० च्या सुमारास दोन्ही संशयित रेजिना पोलिसांना दिसून आले आहेत, असे आरसीएमपीने म्हटले आहे. पोलिसांचे म्हणणे आहे की, हल्लेखोर फरार असल्याने आम्ही मॅनिटोबा आणि अल्बर्टा प्रांतातही अलर्ट जारी केला आहे. हल्लेखोर कदाचित सस्कॅचेवन नंबर प्लेट असलेल्या निसान रॉग कारमध्ये होते. तसेच, हल्लेखोर अद्याप कारमधून प्रवास करत असतील, अशी शक्यता आहे. त्यामुळे इतर राज्यांमध्येही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दैनिक अधिकारनामा




* अकोला, मंगळवार
दि. ०६ सप्टेंबर २०२२



संपादकीय

# बायडेन यांचा अगतिक इशारा

अमेरिकेचे अध्यक्ष जोसेफ बायडेन यांनी फिलाडेल्फियातील ऐतिहासिक वास्तू असलेल्या इंडिपेंडन्स हॉलजवळ केलेले भाषण अमेरिकेतील दुभंगलेल्या राजकीय स्थितीवरील इशारावजा भाष्य ठरले. ते प्रचारकीदेखील होते, कारण येत्या नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होत आहेत. प्रतिनिधिगृहाच्या सर्व ४३५ जागा, सेनेटच्या ३५ जागा, त्याचबरोबर ३६ राज्यांमध्ये गव्हर्नर निवडणुका होत आहेत. अमेरिकी काँग्रेसवर नियंत्रणासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. सध्या सेनेटमध्ये डेमोक्रॅट्स आणि रिपब्लिकन यांना समसमान ५० जागा आहेत. त्यामुळे एखाद्या मुद्दय़ावर कोंडी झाल्यास ती फोडण्यासाठी सदनाच्या



सभापती उपाध्यक्ष कमला हॅरिस यांचे मत निर्णायक ठरायचे. अमेरिकी प्रतिनिधिगृहातही डेमोक्रॅट्सना ४३५ पैकी २२० जागा म्हणजे काठावरचे बहुमत आहे. ते तसेच राखणे किंवा वाढवणे, तसेच सेनेटमध्ये बहुमत प्रस्थापित करणे हे डेमोक्रॅट्ससमोरील आव्हान आहे. अमेरिकेत बऱ्याचदा मध्यावधी निवडणुकांमध्ये अध्यक्षांच्या पक्षापेक्षा वेगळया पक्षाच्या बाजूने कौल मिळालेला आहे. असा कौल रिपब्लिकनांच्या बाजूने जाऊ नये, ही बायडेन यांची प्रधान आकांक्षा. पण हा मुद्दा केवळ एका पक्षाच्या बाजूने कौल दिला जाण्याचा नाही, असा इशारा त्यांनी दिलेला आहे. रिपब्लिकनांना – म्हणजेच ट्रम्प यांच्या समर्थकांना कौल देणे हे अमेरिकी लोकशाहीच्या गळय़ाला नख लावल्यासारखे ठरेल, याकडे बायडेन यांनी लक्ष वेधले आहे. ज्या फिलाडेल्फियात जवळपास २५० वर्षांपूर्वी अमेरिकी स्वातंत्र्याचा जाहीरनामा लिहिला गेला, त्याच शहरात अमेरिकेच्या लोकशाहीविषयी त्यांना इशारा द्य़ावासा वाटणे हे सूचक आहे. याचे कारण ट्रम्प यांनी रिपब्लिकन पक्षामध्ये पुन्हा प्रभाव पाडायला सुरुवात केली आहे.

जवळपास अर्धा डझन प्रकरणांमध्ये त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू आहे. त्यात सर्वात गंभीर प्रकरण आहे, ६ जानेवारी २०२१ रोजी कॅपिटॉल इमारतीवरील जमाव हल्ला. २०२० मधील अध्यक्षीय निवडणूक बायडेन आणि डेमोक्रॅटिक पक्षाने जिंकलीच नाही, तीत आम्हीच विजयी ठरलो असे हास्यास्पद कथानक ट्रम्प आणि त्यांच्या समर्थकांनी पराभव दिसू लागताच आळवले. त्यांच्या पराभवावर शिक्कामोर्तबाची प्रक्रिया सुरू असतानाच कॅपिटॉल इमारतीवर ट्रम्पसमर्थक चाल करून गेले होते. आजही ट्रम्प यांच्या कथानकावर विश्वास असणारे रिपब्लिकन सेनेटर, प्रतिनिधी आणि गव्हर्नर मोठय़ा संख्येने आहेत. मध्यावधी निवडणुकांसाठी रिपब्लिकन उमेदवार ठरण्यासाठी पक्षांतर्गत निवडणूक मेळावे (प्रायमरीज) सुरू झाले आहेत. त्यांमध्ये ट्रम्पसमर्थक निवडून येत आहेत आणि ट्रम्पविरोधक पराभूत होत आहेत. 'निवडणूकहनन कथानका'वर ट्रम्प यांच्या समर्थकांचा गाढ विश्वास आहे आणि कॅपिटॉल इमारतीवरील हल्ल्याला त्यांचा आजही निःसंदिग्ध पाठिंबा आहे. बायडेन यांनी अडखळत्या सुरुवातीनंतर अनेक महत्त्वाची विधेयके द्विपक्षीय मतैक्यातून महत्प्रयासाने काँग्रेसमध्ये संमत करवली. याच काँग्रेसमध्ये उद्य़ा ट्रम्प समर्थकांचे प्राबल्य प्रस्थापित झाले तर वातावरण बदल, आरोग्यविमा, स्थलांतरित अशा अनेक महत्त्वाच्या मुद्दय़ांवर त्यांची कोंडी केली जाईल. ज्या दिवशी डेमोक्रॅट्सच्या प्रभावाखालील कॅलिफोनिऱ्या राज्यात पेट्रोलियम वाहनांवर २०३५ पासून पूर्ण बंदी घातली जाते, त्याच दिवशी रिपब्लिकन प्रभावाखालील टेक्सास राज्यात गर्भपात बेकायदा ठरवला जातो.. अशा दुभंगलेल्या अमेरिकेत ट्रम्प विचारसरणीला थोडेही झुकते माप मिळाले, तर लोकशाहीचा कडेलोट होईल असा अगतिक इशारा बायडेन देतात.

# नेते राज ठाकरेंच्या भेटीसाठी का जातात..?

२०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेला ३०.४१ज्ञ मतं मिळाली होती तर भाजपला २८.२८ज्ञ. या पाच वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. शिवसेनेची ही मतं शिंदे गटाकडे गेली नाहीत तर ती किमान राज ठाकरे यांच्या मनसेकडे तरी जावीत, यासाठी राजकीय नियोजन सुरू झाले आहे. राज यांना वारंवार वेगवेगळ्या नेत्यांनी भेट देण्याने त्यांचे वेगळे महत्त्व अधोरेखित करायचे, त्याचवेळी उद्धव ठाकरे कुठेही चर्चेतच येऊ नयेत, अशा रणनीतीची शक्यताही पुढे येत आहे. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसराज ठाकरे यांच्या भेटीला गेले, तेव्हा त्यांच्या मातोश्रींनी फडणवीस यांचे औक्षण केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गणपतीच्या निमित्ताने राज ठाकरे यांच्या घरी जाऊन त्यांच्या मातोश्रींना नमस्कार करून आले. भाजपचे मुंबईचे माजी अध्यक्ष आणि कॅबिनेटमंत्री मंगल प्रभात लोढा मंत्री झाल्यानंतर राज ठाकरे यांना भेटून आले. राज यांना गेल्या काही महिन्यांत भेटीसाठी कोणते नेते गेले याची यादी केली तर तीच भली मोठी होईल.



एक नगरसेवक आणि एक आमदार असणा्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज यांच्या भेटीला गेले काही दिवस भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाचे नेते का जात आहेत..? हा प्रश्न उभ्या महाराष्ट्राला पडलेला आहे. याचे उत्तर गणितीय पद्धतीने मिळणार नाही त्यासाठी गेल्या दोन-अडीच वर्षांत घडलेला घटनाक्रम आणि सध्याची राजकीय परिस्थिती, गेल्या काही महिन्यांतील घटनाक्रमाची सांगड घालत जावे लागेल. शिवाय राज आणि उद्धव ठाकरे यांच्या स्वभावाचाही शोध घ्यावा लागेल. भाजपला कोणत्याही परिस्थितीत उद्धव ठाकरे वगळता शिवसेना स्वतःच्या ताब्यात हवी आहे. हे करताना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सहानुभूती मिळणार नाही, याची काळजी भाजपला आहे. एकनाथ शिंदे यांना उद्धव ठाकरेंपासून बाजूला करण्यात हीच खेळी खेळली गेली. तुम्ही परत या. समोरासमोर बसून आपण चर्चा करू, असे उद्धव ठाकरे यांनी केलेले आवाहन एकनाथ शिंदे यांना देऊ केलेले मुख्यमंत्रिपद, उद्धव ठाकरे यांच्या उपलब्ध न होण्याचे दिले गेलेले असंख्य दाखले, ही सर्व पार्श्वभूमी महाराष्ट्राला ज्ञात आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा कणा पूर्णपणे मोडून काढायचा असेल तर 'काट्याने काटा काढायचा' या न्यायाने राज ठाकरे यांना पुढे करणे ही एक शक्यता आहे. भाजपने उद्धव ठाकरे यांना दगा दिला; असे ज्यांना वाटते, पण ज्यांची निष्ठा ठाकरे या नावासोबत आहे, त्यांच्यापुढे राज ठाकरे हा पर्याय म्हणून उभा करायचा ही दुसरी शक्यता त्यात आहे. जो मतदार उद्धव ठाकरे यांना सोडून जाईल तो राज ठाकरेंकडे येईल, अशी राजकीय मांडणी पडद्यामागे केली जात आहे. राज ठाकरे यांचे काही प्लस पॉईंट आहेत, जे अन्य कोणत्याही नेत्यांकडे नाहीत. उद्धव ठाकरे यांच्यावर टोकाची आणि कठोर टीका करण्याची क्षमता फक्त राज ठाकरे यांच्यामध्ये आहे. बाळासाहेबांनंतर शिवसेनेचे नेतृत्व राज ठाकरे यांनी करावे, असे सातत्याने सांगणारा एक मोठा वर्ग आहे. राज आणि उद्धव यांनी एकत्र यावे. एकनाथ शिंदे आणि भाजपला सडेतोड उत्तर द्यावे, असा आवाज आता हळूहळू पुन्हा नव्याने ऐकायला येत आहे. तशी शक्यता अत्यंत धूसर आहे, तरीही असे झाले तर मुंबई महापालिका निवडणुकीत त्याचे मोठे नुकसान शिंदे गटाला आणि भाजपला होऊ शकते. म्हणून उद्धव आणि राज यांनी कोणत्याही परिस्थितीत एकत्र येऊ नये ही एक छोटी शक्यता यामागे आहे. राज आणि उद्धव यांनी एकत्र न येता, पडद्याआड जागा वाटपात तडजोडी करू नयेत, हा हेतू आता उघडपणे बोलला जात आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मुंबईवर ठाकरे या नावाचे असणारे गारुड, असे एका रात्रीतून कमी होणारे नाही. त्यामुळे एक तरी ठाकरे आपल्यासोबत असलाच पाहिजे, या हेतूने सध्या राजकीय नेत्यांच्या 'शिवतीर्था'वर चकरा वाढल्या आहेत. गेल्या काही दिवसांतला राजकीय घटनाक्रम पाहिला तर राजभेटीचे 'राज' समजण्यास मदत होईल. शिवसेना भवन कोणाचे? असा विषय सुरू झाला तेव्हा वेगळे सेना भवन शिंदे गट उभे करणार, अशा बातम्या आल्या. त्यावेळी राज ठाकरे यांनी वारसा विचारांचा असतो-वास्तूचा नाही, अशी प्रतिक्रिया दिली होती. एकनाथ शिंदे यांनी आपण हिंदुत्वाच्या रक्षणासाठी महाविकास आघाडीतून बाहेर पडलो, असे सांगताना बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे आणि हिंदुत्वाचा वारसा आपल्याला पुढे न्यायचा आहे, असे विधान केले होते. राज ठाकरे यांनी मनसेची सदस्य नोंदणी सुरू करताना 'हिंदवी रक्षक महाराष्ट्र सेवक', अशी घोषणा दिली. नाथ शिंदे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांचा मनसे दोघांचेही दोघांनीही हिंदुत्वाला घातलेली साद पुरेशी बोलकी आहे. एकनाथ शिंदे महाविकास आघाडी सरकारमध्ये मंत्री असताना आनंद दिघे यांच्यावरील 'धर्मवीर' चित्रपट आला होता. त्या चित्रपटात एका दृश्यात राज ठाकरे आनंद दिघे यांना भेटायला जातात, असा प्रसंग जाणीवपूर्वक कापला गेल्याची टीका मनसेने केली होती. मात्र अशा टीका वेळेनुरूप विसरायच्या असतात, एवढा राजकीय शहाणपणा या दोन्ही पक्षांकडे आहे. हे सगळे संदर्भ आणि पार्श्वभूमी पाहिली तर शिवसेनेचे नेते आणि सध्या एकनाथ शिंदे गटात सामील झालेल्या सदा सरवणकर यांची प्रतिक्रिया बोलकी आहे. दरवर्षी शिवाजी पार्क सभेसाठी आरक्षित करण्यासाठी ते स्वतः पत्र देतात. यावेळी त्यांच्या मते या दसरा मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र आले तर आश्चर्य वाटून घेऊ नका, असे विधान त्यांनी केले आहे. यापेक्षा वेगळे काय सांगायला हवे.

# कागदावरची आमदारकी!

पडत्या फळाची आज्ञा म्हणतात, त्याप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विनंती मान्य करण्यात आली. विधान परिषदेवर राज्यपालांनी नियुक्ती करण्यासाठी पूर्वीच्या सरकारने पाठविलेली यादी रद्द करावी, याबाबतचे मुख्यमंत्र्यांचे पत्र मिळून चोवीस तासही उलटले नाहीत, तोवर ती यादी रद्द करून नव्या सरकारला नव्याने बारा जणांची विधान परिषदेवर निवड करण्यास वाट मोकळी करून देण्यात आली. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या राज्य मंत्रिमंडळाने १२ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या बैठकीत बारा जणांची यादी मंजूर करून राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्याकडे पाठविली होती. दोनच महिन्यांनी त्या घटनेला दोन वर्षे झाली असती. महाविकास आघाडी सरकार आणि राज्यपाल यांच्यात विविध विषयांवरून वितुष्ट निर्माण झाले होते. परिणामी, राज्य मंत्रिमंडळाने पाठविलेली यादी कधी मान्य करायची याचा काही कालावधी कायद्याने निश्चित केलेला नाही. त्यामुळे आपणास वाटेल तेव्हा ती मंजूर करू, अशीच भूमिका कोश्यारी यांनी घेतली. त्या बारा जणांपैकी काही नावांविषयी राज्यपालांनी आक्षेपही घेतलेले नव्हते किंवा तसा काही अभिप्रायही राज्य सरकारला कळविला नाही. वास्तविक ही एका प्रथेप्रमाणे करायची प्रक्रिया आहे.

राज्य सरकारच्या सल्ल्याने किंवा सरकारने शिफारस केलेली नावे मान्य करून विधान परिषदेवर नियुक्त करताना राजकीय मतप्रवाहाचा विचार करायचा नसतो. ज्या सहा राज्यांत विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह आहे, त्या राज्यांचे राज्यपाल नेमणारे केंद्र सरकार एका राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे आणि या सहा राज्यांपैकी काही राज्यांत केंद्रातील पक्षांच्या विरोधातील सरकार सत्तेवर होते. मात्र, असे वाद कोठे झालेले आढळून येत नाही. उत्तर प्रदेशात राम नाईक राज्यपाल असताना अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी पक्षाचे सरकार होते. उत्तर प्रदेशातदेखील विधान परिषद आहे. सरकारने शिफारस केलेल्या काही नावांविषयी राज्यपाल राम नाईक यांना आक्षेप होते ते त्वरित राज्य सरकारला कळविण्यात आले. सरकारने अपेक्षित दुरुस्ती केली आणि राज्यपाल नियुक्त सदस्यांचा मार्ग मोकळा झाला. हा एक लोकशाही परंपरा जपण्याचा भाग आहे. सभ्यता, परंपरा आणि लोकशाही संकेत पाळून लोकशाहीतील संस्थांची प्रतिष्ठा राखायची असते. राज्यपातळीवर वरिष्ठ सभागृह विधान परिषद आहे. देशपातळीवर राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. तेथे राष्ट्रपती नियुक्त काही सदस्य असतात. केंद्र सरकारच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती महोदय त्यांच्या नियुक्त्या करीत असतात. सध्या महाराष्ट्रात ज्या नियुक्त्या दीर्घकाळ रखडल्या त्याप्रमाणे सहा राज्यांतील विधान परिषदेत आणि राज्यसभेत असा वाद झाला नाही. वास्तविक महाराष्ट्रात वादही झाला नाही. अहंकारभावाने यात मात केली आहे. भाजपकडून खासगीत सांगण्यात येत होते की, महाविकास आघाडीचे सरकार लवकरच कोसळणार आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली नवे सरकार येईल तेव्हा आपल्या पक्षाच्या सदस्यांची किंवा भाजप समर्थकांची नियुक्त्या करण्याची शिफारस करण्यात येईल. तोवर या नियुक्त्या होऊच नयेत, अशी गोपनीय मोहीम चालविली गेली. वरिष्ठ सभागृहाच्या बारा जागा सुमारे दोन वर्षे रिक्त आहेत. यादरम्यान विधिमंडळाची अधिवेशने झाली. आता नवे सरकार आले आहे. ते पूर्णतः स्थिरस्थावर झालेले नाही. तरी या सरकारने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सर्वाधिकार देऊन राज्य सरकारने शिफारस केलेली यादी रद्द करण्याची मागणी केली आहे. पत्र मिळताच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी ही मागणी मान्य केली.

# तिकडे मंत्र्यांचा राजीनामा... आणि आपल्याकडे?

तसे पाहता घटना अगदी छोटी आहे. एक भारतीय महिला पर्यटनासाठी पोर्तुगालमध्ये गेली होती. ३४ वर्षांची ही महिला ३१ आठवड्यांची गर्भवती होती. पोर्तुगालची राजधानी लिस्बनमध्ये अचानक तिची प्रकृती बिघडली. तिला तिथल्या सर्वात मोठ्या सांता मारिया इस्पितळात नेण्यात आले. इस्पितळाने प्रसूती कक्षात खाट उपलब्ध नाही असे सांगून शहरातल्या दुसऱ्या इस्पितळाकडे तिला पाठवले. दुसऱ्या इस्पितळात पोहोचण्यापूर्वीच त्या महिलेने प्राण सोडले. मृत आईच्या गर्भातून मूल सुरक्षित बाहेर काढण्यात इस्पितळाला यश आले. परंतु, या घटनेने पोर्तुगालमधील राजकारणात जणू भूकंप आला. सरकारी व्यवस्थेची इतकी चिरफाड सुरू झाली की नाइलाजाने पंतप्रधान अंतोनिओ कोस्टा यांना आरोग्यमंत्री डॉ. मार्टा टेमिडो यांचा राजीनामा घ्यावा लागला. टेमिडो कोणी सामान्य महिला नाहीत. कोविड साथीच्या काळात पोर्तुगालला स्वस्थ ठेवण्यासाठी या मंत्रीबाईंनी खूप मोठे काम केले. जगभर त्यांची तारीफ झाली होती. अशा व्यक्तीकडून राजीनामा घेण्यात आला. यातून दिला जाणारा संदेश अगदी स्पष्ट आहे; तो म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा जीव महत्त्वाचा! भले तो देशाचा नागरिक असो अथवा पाहुणा!! व्यवस्थेतील ढिसाळपणा कोणत्याही प्रकारे सहन केला जाणार जाता कामा नये. आपल्याकडे तर अशा घटना देशाच्या कुठल्या ना कुठल्या भागात रोजच होत असतात. पण मग आपल्या देशात पोर्तुगालप्रमाणे आरोग्य सेवेच्या बाबतीत अजिबात कुचराई होणार नाही, असे धोरण का नसावे? अशी दुर्दैवी घटना घडते तेव्हा आरोग्यमंत्र्यांची गोष्ट सोडाच, एखाद्या इस्पितळाचा एखादा अधिकारी निलंबित झाला असे तरी आपल्याकडे होते का?



मला गेल्या वर्षीची एक घटना आठवते. केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया एक दिवस सामान्य रुग्ण होऊन दिल्लीच्या सफदर जंग इस्पितळात पोहोचले आणि एका बाकावर बसले. तेथे काय चालले आहे हे त्यांना पाहायचे होते. तेवढ्यात एका रक्षकाने त्यांना दंडुक्याने ढोसून ढकलूनही दिले. नंतर इस्पितळातील चिकित्सा सुविधेचा शुभारंभ करताना मांडवीया यांनी स्वतःच ही गोष्ट सांगितली. त्यांनी हेही सांगितले की एक ७५ वर्षीय महिला तेथे आली. आपल्या मुलासाठी तिला स्ट्रेचर पाहिजे होते. परंतु तेथील व्यवस्थेने तिला कोणतीही मदत केली नाही. आरोग्यमंत्र्यांनी दिलेल्या कबुलीचे मला कोणतेही आश्चर्य वाटले नाही. कारण ही अशी अव्यवस्था तर प्रत्येकच सरकारी इस्पितळात असते आणि प्रत्येकाला हे सगळे ठाऊक आहे. नीती आयोगाने गेल्या वर्षी 'रिपोर्ट ऑन बेस्ट प्रॅक्टिसेस इन द परफॉर्मन्स ऑफ डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल्स' या शीर्षकाचा एक पाहणी अहवाल जाहीर केला. हा अहवाल २०१७-१८ या दोन वर्षातल्या परिस्थितीचा होता. त्यातून समोर येणारे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. हा अहवाल असे सांगतो की देशातल्या ७०७ जिल्हा रुग्णालयांपैकी एकही रुग्णालय अपेक्षित कसोट्यांवर शंभर टक्के उतरले नाही. अहवालातल्या उर्वरित आकडेवारीत मी जाऊ इच्छित नाही. परंतु आरोग्य सेवेच्या बाबतीत आपली व्यवस्था सपशेल अपयशी झालेली आहे; या वास्तवाचा स्वीकार करावा लागेल. जागतिक आरोग्य संघटनेनुसार प्रत्येक लोकसंख्येतील दर १००० लोकांमागे किमान पाच खाटा असणे आवश्यक आहे. परंतु आपल्याकडे ही संख्या ०.४च्या आसपास आहे. जपानमध्ये ही संख्या १३ आहे. दुर्दैवी वास्तव हे, की देशात आरोग्य क्षेत्राला आपण कधीही प्राधान्य दिलेले नाही. आपल्याकडे एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या जेमतेम एक टक्का खर्च आरोग्य सेवेवर केला जातो. ब्रिटन, अमेरिकेसारख्या देशात हे प्रमाण ८ टक्क्यांच्या आसपास आहे. जगातल्या एकूण मधुमेहाच्या रुग्णांपैकी १७ टक्के भारतात आहेत हे आपल्याला माहीत आहे काय? यामुळेच भारताला जगाची मधुमेह राजधानी म्हटले जाऊ लागले आहे. परंतु त्याकडे सरकारचे अजिबात लक्ष नाही.

घटकाभर आपण या सगळया गोष्टी बाजूला ठेवल्या तरी सगळ्यात मोठा प्रश्न हा आहे की ज्या काही सेवासुविधा आपल्याकडे आहेत त्यांचा तरी उपयोग ठीकठाक रीतीने केला जातो का? जिल्हा आणि पंचायत पातळीवर आरोग्य सुविधांसाठी सरकारकडून पुष्कळ खर्च होतो. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्स तयार झाली आहेत. सरकारी व्यवस्थेत डॉक्टर्स, परिचारिका, उपकरणे आणि अन्य पायाभूत सुविधांवर जितका खर्च केला जातो तितका खासगी इस्पितळातही होत नाही. परंतु लोक सरकारी इस्पितळात जाणे पसंत करत नाहीत; कारण तेथे गेल्यास रुग्णाला अन्य संसर्ग होण्याची भीती वाटते. साफसफाई नीट होत नाही. यंत्रे बंद असतात. औषधे संपलेली असतात. मी केवळ दोष द्यायचा म्हणून देत नाही, या वास्तवाचा स्वीकार तर करावाच लागेल. तुम्ही कधीतरी सरकारी इस्पितळात जाऊन पहा. तेथे एक प्रकारची उदासीनता पसरलेली असते. ॲम्ब्युलन्स मिळाली नाही म्हणून आपल्या पत्नीचे प्रेत खांद्यावरून नेल्याच्या कितीतरी घटना बातम्यांमध्ये येत असतात. इस्पितळात आग लागून बालकांचे बळी जातात. ऑक्सिजनचा पाईप फुटून रुग्णांचा मृत्यू होतो.. अशा कितीतरी गोष्टी आपल्याकडे सतत होत असतात! परदेशातील सरकारी इस्पितळे नक्कीच इथल्यापेक्षा चांगली असतात. भारताबद्दल बोलायचे तर मुंबईत सरकारी आणि मनपाच्या इस्पितळांची स्थिती पुष्कळ चांगली आहे. पण प्रश्न असा आहे की छोटी शहरे आणि ग्रामीण भागात सरकारी इस्पितळांमधली व्यवस्था आपल्याला सुधारता का येत नाही? कोणी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, नगरसेवक किंवा एखादा मोठा अधिकारी उपचार घेण्यासाठी सरकारी इस्पितळात का जात नाही? आरोग्य सेवा सुधारायच्या असतील तर सर्व लोकप्रतिनिधी आणि सरकारी अधिकाऱ्यांचा तसेच त्यांच्या कुटुंबीयांचा उपचार सरकारी इस्पितळातच होईल, असा नियमच केला गेला पाहिजे... मग पहा कसा चमत्कार होतो ते!

# शिक्षण व्यवस्थेचा!

वर्षानुवर्षाच्या पठडीत मुरलेल्या भारतीय शिक्षण व्यवस्थेला करोना विषाणूच्या साथीने अकल्पित धक्का दिला. त्या धक्क्यातून अद्यापही ना व्यवस्था सावरली, ना विद्यार्थी, ना शिक्षक. दरवर्षीच्या चालीरीती पाळून शिक्षकांना फुले, गजरे देऊन आज शिक्षक दिन साजरा होईल. यंदा भर म्हणून शाळांच्या भिंतीवर शिक्षकांचे छायाचित्र लटकलेले असेल आणि शिक्षक शासकीय अहवालांची कागदी भेंडोळी रंगवण्यात व्यग्र असतील. हे सर्वजण ज्या अध्ययन- अध्यापन, कौशल्य विकास, मूल्यमापन अशा व्यवस्थेचा भाग आहेत ती व्यवस्था शेवटचे उसासे सोडत असेल. दोन वर्षांनंतर करोनाची साथ ओसरल्यावर सॅनिटायझरचे फवारे मारून शाळा सुरू झाल्या. आता करोनाच्या साथीत दगावलेल्यांमध्ये भारतातील शिक्षणव्यवस्थेचा मृत्यू लपवण्याची धडपड सध्या सुरू आहे. उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी तंत्रनिकेतनांच्या निकालाच्या अनुषंगाने मांडलेले मुद्दे याचीच साक्ष देतात. दोन वर्षे संगणक, मोबाईलच्या पटलाकडे पाहून पेक्षा कानातून आणि पटलावर उमटलेल्या अक्षरांतून जेवढे मेंदूपर्यंत पोहोचेल तेवढे पोहोचवणे म्हणजेच शिक्षण आणि वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून, बहुपर्यायी प्रश्नोत्तरांची उत्तरे देऊन मिळालेले गुण म्हणजेच 'गुणवत्ता' असा सवयीने परंतु दृढ समज झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा जुन्या चौकटीत बसणे जमेनासे झाले आहे. अगदी इंजीनिअरिंगच्या विद्यार्थ्यांचीदेखील हीच कथा. पटलावर यंत्राची चित्रे पाहून त्याचा वापर, भाग, तंत्र याची रट्टा मारलेली उत्तरे पटापट खुणा करून सोडवणाऱ्या भावी अभियंत्यांना प्रत्यक्ष प्रत्यक्ष कार्यशाळेत नजरेला पडणारे यंत्राचे अवाढव्य रूप अंगावर काटा उभा करते आहे. प्रत्यक्ष समोर कागद आणि हाती पेन आल्यावर परीक्षेत उत्तरे सुचेनाशी झाली आहेत.

दोन वर्षे गुणपत्रिकेत ८०, ९० गुण पाहण्याची सवय झाल्यानंतर आता ४० गुण मिळवताना होणारी दमछाक विद्यार्थ्यांना मेटाकुटीला आणते आहे. त्यामुळे आता परीक्षा देण्याची सवय राहिली नाही म्हणून परीक्षा पद्धत बदलण्याची, निकालात सवलत देण्याची मागणी विद्यार्थी बिनदिक्कत करू लागले आहेत. तंत्रनिकेतनांच्या निकालाचा मुद्दा चर्चेत आला असला तरी जवळपास सर्वच विद्यापीठातील, विद्याशाखांतील विद्यार्थ्यांची हीच परिस्थिती आहे. ही विद्यार्थ्यांची परिस्थिती आहे तर शिक्षकांचीही फार काही वेगळी नाही. अध्यापनाचे माध्यम, बदलेल्या सवयी यांमुळे आता जुन्या साच्याशी जुळवून घेताना शिक्षकांनाही जड जात असल्याचे ते सांगतात. पूर्वी रोज एक तास एका पाठासाठी किंवा घटकासाठी पुरायचा नाही. वर्षाअखेरीस जादा तास घेण्यावरून शिक्षक खोलीत वादविवाद व्हायचे. आता ४५ मिनिटेही खूप होतात. ऑनलाइन तासिका घेताना पॉवर पॉइंटवरील सादरीकरण करायचे, तेच विद्यार्थ्यांनाही पाठवायचे. त्यातील मुद्द्यांवरून – म्हणजे खरेतर ते पाठ करून – विद्यार्थी परीक्षा देत होते. हीच सवय अधिक लागली आहे, असे मत एका प्राध्यापकांनी व्यक्त केले. दुसऱ्या एका कला विद्याशाखेच्या प्राध्यापकांनी सांगितलेला अनुभवही असाच काहीसा आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांमधील संवाद हा वर्गातील अविभाज्य भाग होता. कधीतरी विषयांतर होऊन वर्गात गप्पा होत असत मात्र, त्यातूनही विद्यार्थी शिकत असत. काही विद्यार्थ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, अडचणी हेही आम्हाला माहिती असायचे. आता हा संवाद खूप कमी झाला आहे. नवे विद्यार्थी हळूहळू रुळत आहेत. मात्र, संवाद साधण्याची, म्हणणे मांडण्याची, शंका विचारण्याची सवय फारशी राहिलेली नाही. एक किंवा दोन वर्षे ऑनलाइन वर्गांमध्ये लॉग इन करून हजेरी लावणाऱ्या विद्यार्थ्यांना संवाद साधताच येत नाही, असे त्या प्राध्यापकांनी सांगितले. फळा वापरण्याची, फळ्यावर लिहिण्याची सवय मोडल्याची खंत एका कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिकेने व्यक्त केली. शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांची परिस्थिती थोडी वेगळी आहे ते रचनेमुळे. मात्र बदललेल्या सवयी आणि जुन्या, नव्या पद्धतींच्या वापरातील गोंधळ हा तेथेही आहे. शाळांमध्ये एकाच वर्गातील विद्यार्थ्यांच्या कौशल्यांमध्ये खूप फरक आहे.

## थोडक्यात

# विवीध धार्मिक पुस्तकांचे प्रसादाचे वाटप



**सुमित सोनोने**

**मुर्तिजापूर :** श्री.गजानन महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त तसेच गणपती उत्सव , गौरी पुजन अशा सुरु असलेला उत्सवांमध्ये महिलांना विविध धार्मिक पुस्तकांचे वाटप करण्यात आले करण्यात आले.त्याचबरोबर महिला आदर गृह वृद्धाश्रम व घरकुल कॉलनी मध्ये प्रसादाचे वाटप करण्यात आले.स्थानिक मुर्तिजापुर शहरातील श्री.गजानन महाराज भक्त परिवारा कडून दरसाल श्री.गजानन महाराजांच्या प्रगटदिना निमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. त्याच बरोबर विविध प्रकारचे धार्मिक पुस्तके जसे श्री.गजानन बावन्नी , हनुमान चालीसा,श्री स्वामी समर्थ,माता पिता प्रेम,आरती संग्रह व इतर अशा धार्मिक साहित्याचे निशुल्क वाटप करण्यात येते.आज पावेतो श्री.गजानन बावन्नी च्या ४ लक्ष प्रति,हनुमान चालीसा,श्री.स्वामी समर्थ,माता पिता प्रेम,आरती संग्रह व इतर साहित्यांच्या २००० ते ३००० प्रति वाटप करण्यात आल्या आहेत.दरवर्षी प्रमाणे यंदा श्री.गजानन महाराज भक्त परिवारा कडून नित्यस्मरण या पुस्तिका छापण्यात आल्या. या पुस्तिका छापण्या करण्याकरिता श्री.च्या भक्तांनी मनोभावे सहकार्य केले.पुस्तिका वाटप करण्याकरिता श्री.गजानन महाराज भक्त परिवारातील भक्तगण व महिलामंडळाने मनोभावे सेवा केली.हया धार्मिक पुस्तिका श्री.चिंतामणी पार्श्वनाथ अल्पसंख्यांक बहु विकास संस्थे कडून उपलब्ध करुन देण्यात आल्या.

# विद्यार्थ्यांनी घेतले लालबागच्या राजाचे दर्शन



**विनोद कांबळे**

**मुंबई :** मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे परिसरातील सुमारे १०० स्वमग्र मुलांनी त्यांच्या पालकांसह काल सकाळी लालबागच्या राजाचे दर्शन घेतले आहे. यावेळी या मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहिला आहे. त्यानंतर त्यांनी माटुंगा येथील जीएसबी गणरायाचेही दर्शन घेतले आहे. चाइल्ड रिहॅबिलिटेशन सेंटर ही स्वमग्र (ऑटिझमग्रस्त) मुलांवर वैद्यकीय उपचार करणाऱ्या व त्यांच्या शैक्षणिक समस्यांबाबत सखोल मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेने विशेष मुलांसाठी हे गणराय दर्शन घडवून आणले आहे.चाइल्ड रिहॅबिलिटेशन सेंटर ही संस्था गेली १२ वर्ष स्वमग्र मुलांना लालबागच्या राजाचे दर्शन घडवत आहे.

स्वमग्र मुलांना समाजात मिसळणे अधिक सोपे जावे , त्यांच्यात सामाजिक संवाद कौशल्य विकसित व्हावीत हा यामागचा हेतू आहे. मात्र गेली दोन वर्ष करोना महासाथीमुळे हे शक्य झाले नव्हते अशी माहिती चाइल्ड रिहॅबिलिटेशन सेंटरचे संस्थापक संचालक ऑक्युपेशनल थेरपिस्ट डॉ. सुमित शिंदे यांनी दिली आहे. ऑक्युपेशनल थेरपिस्ट डॉ. सुमित शिंदे पुढे म्हणाले कि स्वमग्र मुलांच्या वर्तवणुकीच्या काही विशिष्ट समस्या असतात. त्यांना इत्तर सर्वसामान्य मुलांप्रमाणे सहजतेने इतरांमध्ये मिसळता येत नाही. त्यामुळे पालक त्यांना सामाजिक कार्यक्रमांमध्ये घेऊन जाण्याचे टाळतात. त्यामुळे या मुलांमध्ये आणखी भीती निर्माण होते.याउलट जे पालक आपल्या मुलांना समाजातील लहान मोठ्या कार्यक्रमांत सहभागी करून घेतात त्यांच्या मुलांचा विकास तुलनेने अधिक वेगाने होतो.लालबागचा राजा आणि जीएसबी गणपती मंडळाने केलेल्या सहकार्याबद्दल डॉ. सुमित शिंदे यांनी आभार मानले.

# कॉमनवेल्थ तायक्वांदोच्या व्यवस्थापन मंडळावर नामदेव शिरगावकर



**दै. अधिकारनामा**

**मुंबई :** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर यांची जागतिक कॉमनवेल्थ तायक्वांदोच्या व्यवस्थापन मंडळ सदस्यपदी निवड झाली आहे. या मंडळावर नियुक्त झालेले ते पहिले भारतीय ठरले आहेत. ऑस्ट्रेलिया येथे २०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल खेळामध्ये तायक्वांदो या खेळाचा सहभाग व्हावा यासाठी जागतिक तायक्वांदो संघटनेच्या वतीने प्रत्येक खंडातून एका सदस्याची निवड करण्यात आली आहे. यामध्ये आशिया खंडातून नामदेव शिरगावकर यांची निवड करण्यात आली. जागतिक तायक्वांदोचे अध्यक्ष डॉ. चुंगवॉन चौ यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले.

जागतिक कॉमनवेल्थ तायक्वांदोच्या व्यवस्थापकीय मंडळात नियुक्ती होणे आणि काम करायला मिळणे हा माझा सन्मान समजतो. भारत देश आशियातील प्रमुख तायक्वांदो हब बनण्याच्या मार्गावर आहे, त्यामुळे या संधीच्या माध्यमातून त्यासाठी अधिक प्रयत्न करणार आहे. तायक्वांदो खेळाडूंसाठी चांगले काम भविष्यात करणार असल्याची ग्वाही देखील शिरगावकर यांनी दिली. जागतिक तायक्वांदोसह प्रत्येक देशाच्या संबंधित फेडरेशन तायक्वांदोचा कॉमनवेल्थ खेळ म्हणून समावेश करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. भारतीय तायक्वांदोचे अध्यक्ष या नात्याने खेळाडूंना अधिकाधिक सुविधा आणि खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी पुढे सांगितले.

# पल्लवी लांजेवारला न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही

## महिला मुक्ती मोर्चा संघटनेचे अध्यक्ष अशोक खरात



**शरद भेंडे**

**अकोट :** तालुक्यातील महिला मुक्ती मोर्चा चे सर्व पदाधिकारी भंडारा येथे जाऊन पल्लवीला न्याय मिळावा याकरिता निवेदन देण्यात आले. यावेळी अकोट तालुक्यातील तालुकाध्यक्ष लक्ष्मीताई गावंडे अकोला जिल्हा संपर्कप्रमुख गणेश वाकोडे अकोला जिल्हा संघटक गणेश बोंडे अकोट संघटक गजानन धांडे अकोट तालुका उपाध्यक्ष वंदना इंगळे अकोट तालुका सहसचिव पुष्पा तीहिले विठ्ठल यओकार व तसेच अकोला जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून राजकुमार वानखेडे याची निवड करण्यात आली. यावेळी अकोला जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी सामील होऊन नागपूर महिला मुक्ती मोर्चा चे महिला जिल्हा अध्यक्ष दुर्गाताई वाठ यांची मुलगी पल्लवी लांजेवार या मुलींची भंडारा येथील पती,व घरातील नातेवाईक नी प्रथम पल्लवीला फाशी देऊन घरातील पंख्याला लटकविण्यात आले.पल्लवीला न्याय मिळावा व आरोपींवर ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी महिला मुक्ती मोर्चा चे वतीने दि. ३० ऑगस्ट रोजी भंडारा जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले व ३०२ नुसार गुन्हा दाखल केला नाही तर मुंबई येथील आझाद मैदानावर मोर्चा काढला जाईल व महिला वरील अन्याय अत्याचार कधीच खपवुन घेतल्या जाणार नाही असे महिला मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष अशोक खरात बोलताना ठणकून सांगितले. या वेळी भंडारा येथील आमदार भोंडेकर याचे साह्यक सचिव आशिष चवडे यांना सुद्धा निवेदन देण्यात आले.यावेळी महिला मुक्ती मोर्चा चे दर्शिष चौदे,महमुद खान, डॉ.भजनकर, विलास साखोरे, कमलेश कामडी. राजेश्वरी लाजेवार, जयश्री चातुरकर,पुष्पा साखरे,किशोर गेडाम,दिपक गंगवाणी,मिनलताई धोटे,पंकज डोणारकर, दुर्जनसिंह बावरी सह असंख्य महिला मुक्ती मोर्चा चे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच पल्लवी ला न्याय न मिळाल्यास महिला मुक्ती मोर्चा चे वतीने प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यात आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला व सर्व पदाधिकाऱ्यांनी पल्लवीला श्रद्धांजली वाहिली.

# प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२

## स्पर्धेचा मानकरी ठरला कोल्हापूरचा संकेत पाटील



**अविनाश पोहरे**

**अकोला :** दि ४ सप्टेंबर २०२२ सार्थक वक्तृत्व अकॅडमी व सम्यक संबोधी संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय खुली भव्य वक्तृत्व स्पर्धेत कोल्हापुरच्या संकेत पाटील याने प्रथम पारितोषिक पटकावून 'प्रोफेसर डॉ. एम. आर.इंगळे वक्तृत्व करंडक २०२२' हा बहुमान प्राप्त केला.फुले, शाहु, आंबेडकरी विचारवंत व सुप्रसिध्द वक्ते मा. प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त दि.०४ सप्टेंबर २०२२ रोजी सम्यक संबोधी सभागृह,रणपिसे नगर,अकोला येथे राज्यस्तरीय खुली भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.देशातील सद्याची परिस्थिती पाहता संवेदनशील समाज निर्माण होण्यासाठी विचारशील आणि कृतीशील पिढी तयार व्हावी या प्रामाणिक हेतूने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत महाराष्ट्रातील काणा-कोपऱ्यातुन तरुणांनी सहभाग नोंदविला होता. त्याकरिता बक्षिसे म्हणून प्रथम ७०००/-,द्वितीय ५०००/-,तृतीय ३०००/-, प्रोत्साहनपर पाच पारितोषिक प्रत्येकी १०००/- रोख,ट्रॉफी, प्रमाणपत्र व संविधान असे बक्षिसाचे स्वरूप होते. एकून २०,०००₹ ची बक्षीसे होती.या स्पर्धेत प्रथम संकेत पाटील (कोल्हापूर),द्वितीय यश पाटील (मुंबई),तृतीय अक्षय इळके (इचलकरंजी) प्रोत्साहन १) मंदार लटपटे ( परभणी) २) सारांश सोनार (कोल्हापूर) ३) वैष्णवी अतकरे (नागपूर) ४) पवनलाल हुकरे ( भंडारा) ५) विशाल खर्चवाल ( नागपूर) यांनी पारितोषिके पटकाविली. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणुन डॉ. राजेश देशमुख,संजय कमल अशोक,चंद्रकांत झटाले यांनी जबाबदारी पार पाडली.बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.संजय खडसे निवासी उपजिल्हाधिकारी, अकोला हे होते.तर विचारमंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. संदीप भोवते, प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे, सौ. संगीता इंगळे, डॉ. बि. एस. इंगळे,आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. एम. आर. इंगळे यांनी ही स्पर्धा निरंतर सुरू राहील आणि महाराष्ट्रात मानाचे स्थान प्राप्त करेल असे सांगुन स्पर्धेला वाढता प्रतिसाद बघतां अजुन स्पर्धेला सर्वदूर पर्यंत पोहचविण्याचे काम करु असे प्रतिपादन केले.देशातील समस्यांवर चिंतन करण्यासाठी महाराष्ट्रातील तरुण एकत्रित आले हेचं तरुण जागृत आहेत याचे लक्षण आहे. विचारांचा जागर घालणारी ही स्पर्धा आहे. डॉ.एम.आर. इंगळे यांचा वाढदिवस वैचारिक पध्दतीने साजरा होतो याचा सार्थ अभिमान वाटतो.असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. संजय खडसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी हागोणे तर आभार प्रदर्शन विशाल नंदागवळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ मनोहर वासनिक, प्रा.राहुल माहुरे,प्रा.आकाश हराळ,विशाल इंगळे,अमित लोंढे,आदीत्य बावनगडे,नागसेन अंभोरे, अभय तायडे, भरत चांदवडकर,,सागर तायडे,रोहन काळे, अमित वाहूरवाघ, शशिकांत इंगळे,नागेश वाहुरवाघ सागर वारके, यश तिवारी, चेतन डोंगरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सारेगमप लिटिल चॅम्प्स च्या सेटवर झळकली

## पोदार लर्न स्कूल पुसदची चिमुकली आराध्या



**कैलास श्रावणे**

**पुसद :** झी टीव्ही द्वारे घेतल्या जाणाऱ्या रियालिटी शो ठसा रे ग म प लिटिल चॅम्पसठ मध्ये पुसद मधील विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूल ची चौथ्या वर्गाची विद्यार्थिनी कु.आराध्या प्रशांत असोले हिने स्पर्धेची पहिली फेरी यशस्वी रित्या पार केली आहे. यंदा या स्पर्धेचे नववे पर्व आयोजित केले जात असून संपूर्ण महाराष्ट्रातून हजारोच्या संख्येने स्पर्धक ऑडिशन साठी सहभागी झाले होते. संगीत विश्वातील नावाजलेले नाव श्री शंकर महादेवन हे या स्पर्धेचे जज म्हणून काम करीत आहेत, त्यांच्यासारख्या संगीत सम्राटांपुढे गाणे म्हणून स्पर्धेची पहिली फेरी पार केल्यामुळे आराध्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूलमध्ये वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या क्टिव्हिटीज मध्ये आराध्याचा नेहमी सहभाग राहिला आहे. देशभक्तीपर गीत, सोलो सिंगिंग स्पर्धेमध्ये आराध्याने नेहमीच चांगली कामगिरी केली आहे. क्टिव्हिटी बेस अभ्यास क्रम असलेल्या पोदार स्कूलमध्ये वेळोवेळी अनेक क्टिव्हिटीज घेतल्या जातात,शाळेत होणाऱ्या या क्टिव्हिटीज मुळे मुलांना स्टेजडेरिंग वाढवण्याचा व स्वतः मधील सुप्त गुणांना पुढे नेण्याचा जो प्रयत्न केला जात आहे त्याचा फायदा मुलांना होत असल्याचे दिसत आहे. तिच्या या उपलब्धी करीता श्री सुधीर महाजन सर, मेंटोर प्रिन्सिपल, विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूल पुसद तथा प्रिन्सिपल इंटरनॅशनल स्कूल अमरावती व सौ अनुपमा भट देशमुख प्रिन्सिपल पोदार स्कूल पुसद यांच्या हस्ते तिचा शाळेमध्ये सत्कार करण्यात आला. आराध्याला मिळालेल्या यशाबद्दल शाळेचे संचालक श्री शरद मैंद, श्री सुरज डुबेवार, श्री संतोष अग्रवाल, श्री मनिष अनंतवार, श्री संगमनाथ सोमावार, यांनी तिचे व तिच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन केले आहे, तसेच पोदार स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.अनुपमा भट देशमुख व सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंदांनी तिला पुढील वाटचाली करता शुभेच्छा दिल्या.

# प्रकल्प बाधित शेतकरी व रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी जनआंदोलन उभारू – मा.आ.दिपक आत्राम

**साईनाथ दुर्गम**

**सिरोंचा :** तालुका लागत असलेला मेडिगड्डा-कालेश्वर सिंचन प्रकल्प हे संपूर्ण तालुक्यासाठी अभीशाप ठरले असून या प्रकल्पामुळे बाधित शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी जनता रस्त्यावर पडले, शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले, तरीही संबंधित प्रकल्पाचे अधिकारी बाधितांना आवश्यक मदत करण्याऐवजी मूग गिळून बसले,सोबतच मागील तीन वर्षांपासून सिरोंचा-आल्लापल्ली या रस्त्यावर खूप मोठं मोठे खड्डे पडल्याने या रस्त्यावरून प्रवास करताना जनतेला जीव मुठीत घेऊन प्रवास करावं लागतं आहे.असे असतानाही या रस्त्याचे पक्के बांधकाम तर सोडाच साधे खड्डे बुजविण्याचे कामाला सुद्धा सुरुवात झाल्याचे कुठेही दिसून येत नाही. असे अनेक ज्वलंत समस्या आवसून उभे आहेत,त्या सर्व समस्या सरकारच्या निदर्शनास आणून देण्यासाठी व तालुक्यातील समस्यांची तात्काळ निपटारा व्हावं,यासाठी आपण लवकरच जनआंदोलन उभारू,अशी माहिती आविसंचे विदर्भ नेते व अहेरी विधानसभाचे माजी आमदार दिपक दादा आत्राम यांनी कार्यकर्त्यांना दिली. सिरोंचा येथील स्थानिक विश्रामगृहात आयोजित आविसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांना ग्वाही दिली.शुक्रवारला येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात आविसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला माजी आमदार दिपक दादा आत्राम हे प्रामुख्याने उपस्तीत होते.कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना माजी आमदार दिपक आत्राम पुढे म्हणाले,मेडिगड्डा-कालेश्वर सिंचन प्रकल्पाला सर्वप्रथम आविसने ही तीव्र विरोध केला होता. प्रकल्प नको म्हणून आविस ने शेवट पर्यंत लढा दिला,प्रकल्प विरोधात लढत असतांना आविसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या अंगावर गुन्हेही दाखल झाले, आविसच्या विरोधाला न जुमानता तेलंगणा सरकारने प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण केले.अन या प्रकल्पाची फटका ही तालुक्याला बसला.मेडिगड्डा कालेश्वर सिंचन प्रकल्पामुळे भविष्यात सिरोंचा तालुक्याला खूप मोठं फटका बसेल हे आम्ही २०१६ मध्येच विविध आंदोलनाच्या माध्यमातून सांगितल्याचे यावेळी त्यांनी बोलून दाखविले. सिरोंचा-आल्लापल्ली या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांचं रूपांतर आता तलावात झाल्याचे दिसून येत आहे, तालुक्यातील समस्या सोडविण्यात स्थानिक आमदार अपयशी ठरले असून मेडिगड्डा बाधित शेतकऱ्यांना एकरी तीस ते पन्नास लाख रु.मदत मिळवून देण्याचे त्यांचे आश्वासन ही हवेत विरल्याचेही यावेळी त्यांनी टीका केले.

# विज्ञान प्रदर्शनी मध्ये राधाबाई गणगणे विद्यालय प्रथम



**कु.चंचल पितांबरवाले**

**अकोट :** दिनांक ०१/०९/२०२२ रोजी वसुंधरा कॉन्व्हेंट येथे अकोट तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.तालुक्यातील शाळांनी याच्या सहभाग घेतला. वर्ग नऊ ते बाराच्या गटामधून राधाबाई गणगणे विद्यालयचे विद्यार्थी प्रथमेश साबळे व सुरज पुराळे यांनी फळ तोडणी यंत्र विज्ञान प्रदर्शन मध्ये सादर केले, त्यांचे महत्व व उपयोगिता विशद केली. परीक्षकांनी या यंत्राची उपयुक्तता लक्षात घेऊन प्रथम क्रमांक देऊन त्यांना गौरवान्वित केले. या उपकरणांसह विद्यार्थी राधाबाई गणगणे विद्यालयाचे प्रतिनिधित्व जिल्हास्तरावर करणार आहेत. या यशाचे श्रेय ते संस्थाध्यक्ष, मुख्याध्यापक सी.ए. आंबळकर व मार्गदर्शक शिक्षक व आई वडील यांना देतात.

# पोलीस व ग्राम सुरक्षा दलाची ग्राम मुंडगाव येथे गस्त



**शरद भेंडे**

**अकोट :** पोलीस स्टेशन अकोट ग्रामीणकडून ग्रामीण भागातील चोरीच्या, घरफोडीच्या, गोवंश चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक अकोला श्री जी. श्रीधर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, मा. सहायक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट श्रीमती रितू खोखर व ठाणेदार नितीन देशमुख ह्यांचे मार्गदर्शनाखाली ठ माझे गाव, माझी सुरक्षाठ ही योजना राबविण्यात येत असून त्या योजनेअंतर्गत दि. ३/०८/२०२२ चे रात्री पो.स्टे. अकोट ग्रामीणचे हद्दीतील ग्राम मुंडगाव येथे पि एस आय विष्णू बोडखे , ए एस आय बोरुडे, पोका नवरंगाबादी, चालक आस्वार, होमगार्ड श्याम ताडे,होमगार्ड डहाके, श्याम सूरजुसे ह्यांनी पो.स्टे.अकोट ग्रामीण हद्दीतील ग्रामीण भागातील चोरीच्या घटनांना आळा घालण्याचे उद्देशाने ग्रामीण भागात तयार करण्यात आलेल्या ग्राम सुरक्षा दल व गणेश मंडळाचे सदस्यांसोबत ग्राम मुंडगाव ह्या गावात रात्री गस्त करण्यात आली. तसेच ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य तसेच गणेश मंडळाचे सदस्य व गावातील इतर नागरिक ह्यांना रोज गस्त घालनेबाबत व गस्त कशी करावी ह्याबाबत सूचना देण्यात आल्यात. तसेच मालमत्तेची सुरक्षा कशी करावी, चोरीच्या व घरफोडीच्या घटनांना आळा कसा घालावा तसेच सायबर गुन्ह्यापासून कसे सुरक्षित राहावे ह्या बाबत पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे ह्यांनी गावातील नागरिकांना व युवकांना मार्गदर्शन केले.

# मोरया मोरया' गाण्याने संपूर्ण नगरी दुमदुमली



**कैलास श्रावणे**

**पुसद :** दरवर्षी काही ना काही नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात अग्रेसर असलेल्या चिंतामणी गणेश मंडळाने यावर्षी राष्ट्रीय दिव्यांग संघ यांचा बहारदार संगीतमय गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता.मंडळाने दिलेल्या संधीचा फायदा घेऊन राष्ट्रीय दिव्यांग संघाने अतिशय उत्साह पूर्ण गीते गाऊन संपूर्ण श्रोत्यांची मने जिंकली. त्यातच एक कमी वयाचा यश गायकवाड यांनी सर्वप्रथम 'मोरया मोरया' हे गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्याच्या या गायनाने कार्यक्रमांमध्ये जो उत्साह निर्माण झाला तो कार्यक्रमाच्या शेवटपर्यंत राहिला. त्यानंतर 'ताशाचा आवाज तरर झाला' 'पार्वतीच्या बाळा' अशी एक ना अनेक बहारदार गीते याठिकाणी मोठ्या उत्साहाने राष्ट्रीय दिव्यांग संघाने सादर केली. अशा या पुसद तालुक्यातील काकडदाती येथील गोविंद नगर मध्ये मागील २३ वर्षापासून सतत गणपती उत्सव साजरा करण्यात येत असून दरवर्षी या मंडळाचा काही ना काही नाविन्यपूर्ण उपक्रम चालू असतो. म्हणूनच संपूर्ण काकडदाती ती परिसरामध्ये चिंतामणी गणेश मंडळाचे नाव सदा अग्रेसर असते. यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता संपूर्ण चिंतामणी गणेश मंडळाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# नंगपुरा मुर्री इथे ३ दिवसीय शिबीराचे नि:शुल्क आयोजन




**देवेंद्र बिसेन**

**गोंदिया :** आज दि ४ रोजी नंगपुरा मुर्री इथे हनुमान मंदिर जवळ दुपारी ४ वाजे पासून शिबीराचे आयोजन शुरू होणार आहे.ह्या शिबीरात गोंदिया चे प्रसिध्द स्पार्क आय केयर एण्ड हेल्थ केअर फाऊंडेशन तर्फे ३ दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आला आहे. ह्या शिबीरात मोतियाबिंदु चा ऑपरेशन नि:शुल्क करण्यात येणार आहे. व आरोग्य विषय सल्ला देणार आहेत. ह्या शिबीरात ब्लड सुगर,ब्लड प्रेसर, व आरोग्याची तपसणी करण्यात येणार आहेत. याकरिता आयोजकांनी नागरिकांनी जास्तीत जास्त ह्या शिबीरात उपस्थित रहावे.असी विनंती केली आहे. प्रकाश रहमतकर, सुरेंद्र गेडाम, अनिल कटरे, अशोक हरिणखेडे, मनिष ठवरे, प्रणव लिचडे, ओमप्रकाश पारधी, महेंद्र आंबेडारे, नरेंद्र सोनवाने, अमित ठाकरे, देवराज बर्वे, अजय सुर्यवंशी, गणेश तुलसीकर, उमेश पारधी, बालु मोरघडे, बब्बु येळे, मूकेश बारेवार, राज राऊत, हे सर्व आयोजक उपस्थित राहाणार आहेत.

थोडक्यात

## ९८ बेवारस वाहनांच्या मूळ मालकांचा लागला शोध



दै. अधिकारनामा

**वडगाव मावळ :** वडगाव मावळ पोलिस स्टेशन व गंगामाता वाहन शोध संस्था यांनी संयुक्त पणे ९८ वाहनांच्या मूळ मालकांना शोधून काढले असून संबंधित मालकांनी आपली ओळख पटवून वाहन घेऊन जावे, असे आवाहन पोलिस निरीक्षक विलास भोसले यांनी केले आहे. पोलिस ठाण्यात शेकडो वाहने विविध गुन्ह्यांमध्ये पोलिस जप्त करतात. मात्र न्यायालयीन प्रक्रियेमुळे व बेवारस वाहनांचे मालक मिळून येत नसल्यामुळे ही वाहने पोलिस ठाण्याच्या आवारात अनेक वर्षे मालकांच्या प्रतीक्षेत धूळ खात पडून आहेत.या पाश्वभूमीवर पुणे ग्रामीण पोलिस दलाचे पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी पुढाकार घेत बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध घेत ती वाहने त्यांच्या ताब्यात देण्याचे आदेश प्रभारी अधिकारी यांना दिले आहे. त्यानुसार अप्पर पोलिस अधीक्षक मितेश घट्टे उपविभागीय पोलिस अधिकारी भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनानुसार वडगाव मावळ पोलिसांनी बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी पोलिसांनी परंदवडी येथील गंगामाता वाहन शोध संस्थेची मदत घेतली. या संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी वडगाव मावळ पोलिस ठाण्यात बेवारस अवस्थेत असलेल्या वाहनांची पाहणी केली. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने बेवारस वाहनांचे चासि व इंजिन क्रमांक यावरून वाहनांच्या मूळ मालकांचा शोध लावला.एकूण ९८ वाहनांपैकी ४९ बेवारस वाहने आहेत, मूळ मालकांनी पत्र मिळताच ८ दिवसाच्या आत आपले वाहन घेवून जावे. अन्यथा त्या ५४९ वाहनांचा न्यायालयीन आदेशाने लिलाव करण्यात येईल, असेही पोलिस निरीक्षक विलास भोसले यांनी सांगितले. मूळ मालकांचा शोध लावण्यासाठी पोलिस निरीक्षक विलास भोसले, पोलिस हवालदार मनोज कदम, श्रीशैल कंटोळी, संदीप वंडाळे, सिद्धान्त वाघमारे व संस्था अध्यक्ष राम उदावंत उपाअध्यक्ष बाबासाहेब बागडे, संजय काळे यांनी परिश्रम घेतले.

## फ्लॅट भाड्याने देण्याच्या बहाण्याने फसवणूक



दै. अधिकारनामा

**पिंपरी :** फ्लॅट भाड्याने देण्यासाठी डिपॉझिट भरण्याच्या बहाण्याने घरमालकाच्या बँक खात्यातून ऑनलाईनद्वारे तब्बल दोन लाख रुपये काढून घेण्यात आले. हा प्रकार ७ जून ते ३ सप्टेंबर या कालावधीत घडला आहे. या प्रकरणी विवेकानंद कल्यानी मुदकन्ना (वय २० रा. निगडी प्राधिकरण) यांनी निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी अज्ञात मोबाईलधारकाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. निगडी प्राधिकरण येथील फिर्यादी यांना त्यांचा फ्लॅट भाड्याने द्यायचा होता.यावेळी आरोपीने मोबाईल वरून संपर्क साधत आपण आर्मी ऑफिसर असल्याचे सांगितले. फिर्यादीचा विश्वास संपादन करत आरोपीने वेगवगेळ्या मोबाईल नंबरवरून फोन करत फ्लॅटचे डिपॉझिट देण्याचा बहाणा केला. यासाठी त्याने फिर्यादी यांचे बँक तपशील मागितले. तसेच फिर्यादीच्या वडिलांचे बँक खाते त्याच्या बँक खात्याला ॲड करण्यास सांगितले आणि वडिलांच्या खात्यावरील परस्पर १ लाख ९० हजार रुपये काढून घेतले, असे फिर्यादीत नमूद केले आहे.

## राज्यातील ३१ गावे बँक व्यवहाराविना




दै. अधिकारनामा

**औरंगाबाद :** केंद्र सरकार 'डिजिटल' व्यवहारासाठी आग्रही असतानाच राज्यातील ३१ गावांमध्ये अद्याप बँक व्यवहारच होत नाहीत. या संदर्भातील आकडेवारी राज्यस्तरीय बँकर्स समितीसमोर ठेवण्यात आली आहे.राज्यातील १ हजार ८०० गावांमध्ये बँका पोहोचल्याच नाहीत काय, असा प्रश्न अलीकडेच मुख्य सचिवांनी उपस्थित करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यानंतर केंद्र सरकारच्या वित्तीय सेवा विभागाने ५६ गावांची यादी राज्य सरकारला पाठविली आणि त्यातील ३१ गावांमध्ये अजूनही व्यवहारालाही बँक नसल्याचे स्पष्ट झाले आहे.डॉ. भागवत कराड यांच्या उपस्थितीमध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत हा मुद्दा तिसऱ्या क्रमांकावर चर्चेत ठेवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. बँकच नसल्याने डिजिटल बँक, डिजिटल रुपया, व्यवहारातील पारदर्शकता हे ओघानेच येणारे विषय अनेक गावांत नाहीत. अनेक गावांत बँक प्रतिनिधी असले तरी आंतरजाल सुरू राहण्यासाठी आवश्यक असणारी 'रेंज'च उपलब्ध नसल्याने व्यवहार काही पुढे सरकत नाहीत.सार्वजनिक बँकांच्या शाखांची संख्या दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. २०१९ मध्ये सार्वजिक बँकांची संख्या आठ हजार ५९४ होती. आता ती घसरून सात हजार ६३२ आहे. गेल्या काही दिवसांत बँकांचे विलीनीकरण झाल्यानेही ही स्थिती निर्माण झाल्याचे सांगण्यात येते.

बँक ऑफ बडोदामध्ये देना आणि विजया या बँकांचे विलीनीकरण झाले. सिंडिकेट बँक ही कॅनरा बँकेत विलीन झाली तसेच इंडियन बँकेत अलाहबाद बँकचे विलीनीकरण झाले. त्यामुळेही शाखा कमी झाल्याचे सांगण्यात येते. एक बाजूला व्यवहार 'डिजिटल' करा असा आग्रह असताना सुमारे १ हजार ८०० बँकांचे व्यवहार रडतखडत सुरू आहेत. तर ३१ गावांत बँक व्यवहाराच होत नाहीत. त्यावर सोमवारी बैठकीत चर्चा होईल असे सांगण्यात येते.नंदूरबार, नांदेड पालघर या जिल्ह्यांत बँक व्यवहार नसणारी गावे अधिक आहेत.

# शहापुरात कुपोषणाचा विळखा घट्ट

दै. अधिकारनामा

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील कुपोषित बालकांच्या कच्च्या आहारातून तेलच गायब झाले आहे. विविध समस्यांनी ग्रासलेल्या शहापूर तालुक्याला कुपोषणाचा विळखा घट्ट बसत चालला आहे. तालुक्यातील आदिवासी पाड्यांमध्ये गेल्या महिन्यात तब्बल ७९५ कुपोषित बालके आढळून आली. त्यापैकी तीव्र कुपोषित असलेली ८५ बालके मृत्यूशी झुंज देत आहेत. तर गेल्या महिन्याभरात ७ बालकांचा मृत्यू झाला असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

शहापूर तालुक्यात मिनी अंगणवाड्यांसह ७२९ अंगणवाड्या असून त्यामध्ये ३० हजार ४१७ बालके आहेत. यात दर महिन्याला ० ते ६ वयोगटातील मुलांचे अंगणवाडी सेविकांमार्फत वजन घेतले जाते. वजन कमी असल्यास या बालकांची मध्यम कुपोषित आणि तीव्र कुपोषित अशी वर्गवारी केली जाते. मात्र, तालुक्यात कुपोषित बालकांसाठी तसेच गरोदर व स्तनदा मातांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध आहार योजनांचा बोजवारा उडाला आहे. शेती हंगामा व्यतिरिक्त रोजगारासाठी भटकंती करावी लागत असल्याने कुपोषण फोफावत चालले आहे. विद्यमान सरकार मात्र याकडे डोळेझाक करीत असल्याने कुपोषणाची तीव्रता वाढत चालली आहे.तालुक्यातील शहापूर व डोळखांब प्रकल्पांतर्गत ७१० मध्यम कुपोषित तर ८५ बालके तीव्र कुपोषित असून गेल्या महिन्यात विविध आजाराने ग्रासलेल्या सात बालकांचा मृत्यू झाल्याची नोंद शासनदरबारी आहे. कुपोषित बालकांचे उंचीनुसार वजन प्रमाणात येण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येतात. मात्र या योजनांमधून मूळ उद्देशच सफल होत नसल्याने कुपोषित बालकांच्या आकडेवारीत वाढ होत आहे.



**तेलाअभावी आहार शिजवायचा कसा?**

कुपोषित बालकांसाठी तसेच गरोदर व स्तनदा मातांसाठी राबविण्यात येणाऱ्या घरपोच आहार योजनेत कच्चा आहार देण्यात येतो. त्यामध्ये ५० दिवस पुरेल इतके गहू, मूगडाळ, चणाडाळ, साखर, हळद, मीठ मिरची देण्यात येते. हा कच्चा आहार शिजविण्यासाठी आवश्यक असणारे तेल देण्यात येत नसल्याने तेलाअभावी आहार शिजवायचा कसा हा जटील प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच गरोदर आणि स्तनदा मातांसाठी असलेल्या अमृत आहार

**३५ रुपये ताट देणे अशक्यच**

या योजनेत धान्य विकत घेऊन व शिजवून या मातांना अवघ्या ३५ रुपयांत देण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यावर सोपवण्यात आली असल्याने त्यांची अक्षरशः पिळवणूक होत असल्याचे समजते. महागाई गगनाला भिडली असताना ३५ रुपये ताट देणे अशक्यच असल्याने त्यांना परिपूर्ण आहार मिळत नसल्याची ओरड होत आहे.

# १५ शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव



दै. अधिकारनामा

**जळगाव :** जिल्हा परिषद प्रशासनातर्फे देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाले होते. त्यानुसार आज शिक्षकदिनी १५ शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सत्कार करण्यात आला. महाबळ येथील छत्रपती संभाजीराजे नाट्यगृहात जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात आले.याप्रसंगी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, महापौर जयश्री महाजन, शिक्षक आमदार सुधीर तांबे, आ. शिरीष चौधरी, आ. अनिल पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप खोडपे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासह जिल्ह्यातील सत्कारमुर्ती शिक्षक आदी उपस्थित होते.१७ शाळांची मॉडेल म्हणून निवड , यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये २२५ खोल्यांचे बांधकामाला सुरूवात करण्यात आली आहे. तर २७८ शाळा खोलींच्या दुरूस्तीचे काम हाती घेतले आहे. जिल्ह्यातील १७ शाळांची आदर्शन मॉडेल म्हणून निवड करण्यात आली आहे. दरम्यान गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यावर्षी मराठी शाळेची पटसंख्या वाढलेली दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्कार प्राप्त शिक्षक दर्शना नथ्थू चौधरी (शिरुड, अमळनेर), मनीषा गोकुळ अहिरराव (यशवंतनगर, भडगाव), रवींद्र माणिक पढार (मांडवदिगर, भुसावळ), मनीषा नारायण कचोरे (मनूर बु., बोदवड), उत्तम धर्मा चव्हाण (शिवापूर, चाळीसगाव), विश्वनाथ गोरक्षनाथ पाटील (नागलवाडी, चोपडा), संजय पोपट गायकवाड (मुसळी, धरणगाव), लक्ष्मण वामन कोळी (चंदनबर्डी, एरंडोल), ललिता नितीन पाटील (कानळदा, जळगाव), कीर्ती बाबूराव घोंगडे (पहूर कसबे, जामनेर), विजय वसंत चौधरी (पिंप्रीनांदू, मुक्ताईनगर), अरुणा मुकुंदराव उदावंत (राजुरी, पाचोरा), छाया प्रभाकर भामरे (मोंढाळे, पारोळा), रामराव ज्ञानोबा मुरकुटे (खिरोदा, रावेर), समाधान प्रभाकर कोळी (साकळी, यावल) यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

# औरंगाबादेत रोबोटच्या हस्ते गणरायाची आरती अन् प्रसादाचेही वाटप

दै. अधिकारनामा

**औरंगाबाद :** अवघ्या महाराष्ट्रात भक्तीभावाने आणि जल्लोषाच्या वातावरणात गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. औरंगाबादमध्ये गणेशोत्सव साजरा करताना अध्यात्माला टेक्नॉलॉजीची जोड देण्यात आली. वाळूज एमआयडीसीमधील मेटलमॅन ऑटो प्रा.लि. कंपनीमध्ये चक्क रोबोटच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात येत आहे.हा रोबोट सर्वांच्या आकर्षणाचा केंद्र बनला असून,सकाळी आणि संध्याकाळी कंपनीमध्ये रोबोटच्या हस्ते आरती करण्यात येते. इतकेच काय आरतीला उपस्थित असलेल्या प्रत्येक गणेशभक्ताला रोबोट प्रसादाचेही वाटप करतो. मेटलमॅन ऑटो या कंपनीच्या वाळूज येथील बी १२ या प्लांटमध्ये शंभरावर रोबोटच्या माध्यमातून काम करण्यात येते.गेल्या २० वर्षांपासून उद्योग क्षेत्रामध्ये काम करत असलेल्या या कंपनीमध्ये दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

कंपनीमध्ये प्रामुख्याने रोबोटकडून वेल्डिंग, चेकिंग, इन्स्पेक्शन आदी काम करवून घेण्यात येतात, ज्या ठिकाणी बारा महिने चोवीस तास रोबोटसोबत काम करतो, त्याच रोबोटच्या हस्ते यंदा गणरायाची आरती करण्याची कल्पना कामगारांनी सीईओ श्रीकांत मुंदडा यांच्यासमोर मांडली आणि त्यांनी तत्काळ यास मंजूरी दिली. यानंतर कामगारांनी रोबोट तयार करुन त्यामध्ये आरती करण्याचा तसेच प्रसाद वाटण्याचा प्रोग्राम सेट केला. आता गणेशोत्सव काळात दररोज सकाळी आणि संध्याकाळी गणरायाची आरती रोबोटच्या माध्यमातून करण्यात येते.या विषयी बोलताना प्रोडक्शन हेड तसेच सीएसआर विभागाचे प्रमुख अवधुत शिंदे म्हणाले की, रोबोटचा आणि आमचा जिव्हाळ्याचा संबंध आहे, याचा रोबोटचा उपयोग महाराष्ट्राचा सर्वात मोठा उत्सव असलेल्या गणेशोत्सवात करावा असे आम्हाला वाटले, वरिष्टांकडून परवानगी मिळताच सर्वजण कामाला लागलो आणि रोबोट तयार झाला. या माध्यमातून आम्ही अध्यात्माला टेक्नॉलॉजीची जोड देण्याचा संदेश पोचवण्याचा प्रयत्न केला असल्याचे शिंदे यांनी सांगितले.




**रोबोटमध्ये आरती ओवळण्याचा प्रोग्राम सेट**

रोबोट तयार करताना आरती ओवळणे तसेच प्रसाद वाटप करण्याचा प्रोग्राम सेट करण्यात आला आहे. आरती सुरु करताच रोबोट गणरायाला आरती ओवाळण्यास सुरुवात करतो. आरती संपल्यानंतर प्रत्येक कर्मचाऱ्यासमोर प्रसादाचे तबक घेऊन रोबोट जातो आणि कर्मचारी प्रसाद घेतात. गणेशोत्सव कालावधीत दररोज सकाळी आणि संध्याकाळी रोबोटच्या हस्ते ही आरती करण्यात येते.

# शेतकर्यांसमोर घोंगावतेय दुहेरी नैसर्गिक संकट



दै. अधिकारनामा

**ढोरजळगाव :** शेतकऱ्यांसमोर सतत काही ना काही संकटे येत असतात. कधी नैसर्गिक, तर कधी सरकारी धोरण. आता नव्यानेच जनावरांमध्ये होणारा त्वचारोग म्हणजे लम्पी स्किन डीसिज आणि ऊस, गवतावर आढळणारी घोणस अळी, असे दुहेरी संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. ही अळी माणसाच्या शरीरावरही परिणाम करणारी आहे. आफ्रिकन देशात आढळणारा 'लम्पी स्किन डीसिज' हा जनावरांमध्ये होणारा त्वचारोग. त्याचा वेगाने प्रसार महाराष्ट्रात होत असून, नगर जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतील अनेक जनावरांमध्ये लागण झाली आहे.यामुळे पशुपालकांमध्ये खळबळ उडाली आहे. माश्या, डास, गोचिड आदींमार्फत प्रसार होणाऱ्या या संसर्गजन्य आजारामध्ये प्रथम जनावरांच्या डोळ्यातून व नाकातून पाणी येते, लासिकाग्रंथींना सूज येऊन भरपूर ताप येतो, त्वचेवर १० ते ५० मिमी व्यासाच्या गाठी मान, पाय, डोके, मायांग, कास आदी ठिकाणी येतात. डोळे, नाकांमध्ये व्रण निर्माण होतात. त्यामुळे जनावरांना चारा चघळता येत नाही. डोळ्यांतील व्रणामुळे चिपडे येऊन दृष्टी बाधित होते. फुफ्फुसाचा आणि स्तनाचा दाह होऊन जनावर दगावण्याची शक्यता असते. शेवगाव तालुक्यात सध्या एकही जनावर बाधित नसले, तरी शेजारील नेवासा तालुक्यातील देवसडे येथे अशी लक्षणे जनावरांमध्ये आढळल्याने पाच किलोमीटर परिघातील गावांमध्ये खबरदारीचा उपाय म्हणून लसीकरण केले जात आहे.

दिवसेंदिवस वातावरणात बदलांचा परिणाम शेतकऱ्यांच्या पिकांवर होत असताना ऊस आणि गवतावर घोणस नावाची हिरवट पिवळ्या रंगाची अळी आढळून येते. तिचा परिणाम केवळ पिकांवर न होता माणसांवरही होत असून, हा घातक परिणाम दिसून येत आहे. या अळीच्या त्वचेला स्पर्श झाल्यास त्वचेला खाज सुटून असह्य वेदना होते. नंतर उलट्या होऊ लागतात, अर्धे शरीर बधिर पडून जीभ अडखळून बोलताही येत नाही. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात तीन व नगर तालुक्यात चार असे सात रुग्णांबरोबर शेवगाव तालुक्यातील निंबेनांदूर येथील एका महिलेस उपचारार्थ रुग्णालयात दाखल व्हावे लागले आहे. या अळीचा प्रादुर्भाव होऊ नये, तसेच ही अळी अंगावर येऊ नये, याची खबरदरी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अगोदरच दुधाला भाव नसल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी या दुहेरी नैसर्गिक संकटामुळे भीतीचे वातावरण निर्माण आहे.

## ८ महिन्यांत हरवलेली ७७ मुले घरी परतली



दै. अधिकारनामा

**ठाणे :** अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्यास त्यांच्या मिसिंगची तक्रार ही अपहरण म्हणूनच दाखल करण्यात यावी, असे सवोच्च न्यायालयाचे आदेश असल्यामुळे अपहरणाच्या दाखल गुन्ह्यातील आकडेवारीत वाढ होत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या पार्श्वभूमीवर बऱ्याच वर्षांपासून शोध न लागलेल्या मिसिंग मुलांची शोध मोहीम ठाणे गुन्हे शाखेने हाती घेतली आहे. गुन्हे शाखेच्या मानवीय तस्करी प्रतिबंधक पथक, चाईल्ड प्रोटेक्शन युनिट व इतर पथकांमार्फत गेल्या आठ महिन्यांत हरवलेल्या ७७ मुलांचा शोध घेतला.ठाणे पोलिसांनी गेल्या अनेक वर्षांपासून हरवलेले व अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलांची फाईल रिओपन करीत त्यांची शोध मोहीम हाती घेतली आहे. जानेवारी ते ऑगस्ट २०२२ या गेल्या आठ महिन्यांत तीन व त्याहून अधिक वर्ष शोध न लागलेल्या ७७ अल्पवयीन मुलांचा

शोध घेऊन त्यांना पालकांच्या ताब्यात सुखरूप देण्याची कामगिरी ठाणे गुन्हे शाखेने बजावली आहे.दरम्यान, अपहरणांच्या दाखल एकूण गुन्ह्यात ७५ टक्के गुन्हे हे लहान मुलांच्या अपहरणाचे आहेत. लहान मुलांचे अपहरण करून त्यांना भिक मागण्याच्या कामाला लावणाऱ्या अनेक टोळ्या मुंबई ठाणे परिसरात कार्यरत असल्याचा देखील संशय पोलिसांना आहे. ह्या टोळ्या आपल्या हस्तकांमार्फत लहान मुलांचे अपहरण करतात. तर खंडणीसाठी देखील मोठ्या प्रमाणात अपहरण करण्याच्या घटना घडत असल्याचे दिसून येते.

## शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठाला २२ लाखांचा गंडा




दै. अधिकारनामा

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाला २१ लाख ८७ हजारांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चोरट्याच्या विरोधात माहिती-तंत्रज्ञान कायदा तसेच फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत ज्येष्ठ नागरिकाने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.तक्रारदार ज्येष्ठ नागरिक वानवडी भागात राहायला असून ते सेवानिवृत्त आहेत. चोरट्याने शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखविणारे एक लिंक ज्येष्ठ नागरिकाला पाठविली होती. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले होते. चोरट्याच्या मोबाइल क्रमांकावर ज्येष्ठ नागरिकाने संपर्क साधला. तेव्हा शेअर बाजारातील व्यवहारासाठी खाते उघडावे लागेल, असे सांगून चोरट्याने त्यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने पैसे घेतले.त्यानंतर वेगवेगळ्या प्रकारे बतावणी करुन चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाकडून पैसे उकळले. चोरट्याने ऑनलाइन पद्धतीने ज्येष्ठ नागरिकाकडून २१ लाख ८७ हजार रुपये घेतले. ज्येष्ठ नागरिकाला कोणताही परतावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर ज्येष्ठ नागरिकाने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अजित शिवले तपास करत आहेत.

## उत्पादन येण्याआधीच सोयाबीनच्या दरात ७०० रुपयांची घट



दै. अधिकारनामा

**खामगाव :** जिल्ह्यात सोयाबीनची पेरणी मोठ्या प्रमाणात करण्यात येते. गतवर्षी सोयाबीनला चांगला भाव मिळाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी यावर्षीही जास्त भाव मिळेल या आशेने पेरणी केली. जिल्ह्यात सोयाबीनचे सरासरी पेरणी क्षेत्र ३ लाख ९४ हजार ४२५ आहे. तर यावर्षी ३ लाख ९७ हजार ४५३ हेक्टरवर म्हणजे १००.७७ टक्के पेरणी झाली आहे. जास्त दर मिळेल या आशेने सरासरी पेरणी क्षेत्रापेक्षा सात हजार हेक्टरवर जास्त पेरणी करण्यात आली आहे.सोयाबीनचे दर गत दहा दिवसांपर्यंत ५ ते ६ हजार रुपयांपर्यंत होते. दोन महिने हेच दर स्थिर होते. मात्र, आता दहा दिवसांत सातशे ते आठशे रुपयांनी भाव घसरले आहेत. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनचा दर ४३०० ते ५३०० पर्यंत आहे. एक महिन्यानंतर शेतकऱ्यांचे सोयाबीन बाजारात आल्यावर आणखी भाव घसरण्याची शक्यता आहे. यावर्षी जिल्ह्यात पाऊस उशिरा झाला. त्यामुळे पेरणी उशिरा करण्यात आली. त्यातच जुलै महिन्यामध्ये सतत पाऊस झाला. त्यामुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढला. यावर्षी जास्त भाव मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, आताच भाव पडल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण आहे.सोयाबीनच्या शेंगा धरल्या असून, पुढील महिन्यात पीक येणार आहे. मात्र, त्यापूर्वीच सोयाबीनच्या दरात ७०० रुपयांची घसरण झाली आहे. शेतकऱ्यांचे पीक बाजारात आल्यावर दरवर्षीप्रमाणे आणखी भाव घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण आहे.